पुणे महानगरपालिका

*** स्थायी समिती ***

**कार्यपत्रिका क्रमांक १६**

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **मंगळवार दि. २१/७/२०२०** रोजी सकाळी ११:०० (अकरा) वाजता **स्थायी समिती सभागृह, दुसरा मजला, पुणे महानगरपालिकेची नवीन विस्तारीत इमारत येथे भरेल.**

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

## उप आयुक्त, विभागीय कार्यालय यांचे कामकाजाचा आढावा

**विषय क्र. ३०२**

उप आयुक्त, परिमंडळ विभाग क्र. १ चे अखत्यारीत येणाऱ्या ढोले पाटील रोड/येरवडा–कळस/नगर रोड (वडगांवशेरी) क्षेत्रिय कार्यालयाकडील माहे जून २०२० चा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा. उप आयुक्त, परिमंडळ विभाग क्र. १ यांचे जा.क्र. उप–१/१७२३ दि.८/७/२०२० चे पत्र.

## माहितीसाठी आलेले विषय

**विषय क्र. ३०३**

सह महापालिका आयुक्त, परिमंडळ विभाग क्र. ४ यांच्या अखत्यारीतील दि. १/६/२०२० ते दि.१५/६/२०२० पर्यंतची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तद्नुषंगिक माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/प.क्र.४/१६३ दि.१०/७/२०२० चे पत्र.

**विषय क्र. ३०४**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५(१) अन्वये दि. ४/१/२०२० अखेर संपलेल्या आठवडयाचा तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०६(१) (अ) अनुसरुन दि. ४/१/२०२० अखेर संपणाऱ्या आठवडयाचा मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र.मुलेप/५३९ दि. १३/७/२०२० ने पाठविलेला अहवाल तसेच या आठवड्यात मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी त्यांच्या पत्रात नमूद केलेल्या विविध खात्याकडील आढळून आलेली वसूलपात्र रक्कम रुपये ७,१५,४१६/– चा तक्ता माहितीसाठी.

**विषय क्र. ३०५**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५(१) अन्वये दि. ११/१/२०२० अखेर संपलेल्या आठवडयाचा तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०६(१) (अ) अनुसरुन दि. ११/१/२०२० अखेर संपणाऱ्या आठवडयाचा मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र.मुलेप/५४० दि. १३/७/२०२० ने पाठविलेला अहवाल तसेच या आठवड्यात मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी त्यांच्या पत्रात नमूद केलेल्या विविध खात्याकडील आढळून आलेली वसूलपात्र रक्कम रुपये ३,६६,३३६/– चा तक्ता माहितीसाठी.

**विषय क्र. ३०६**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५(१) अन्वये दि. १८/१/२०२० अखेर संपलेल्या आठवडयाचा तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०६(१) (अ) अनुसरुन दि. १८/१/२०२० अखेर संपणाऱ्या आठवडयाचा मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र.मुलेप/५४१ दि. १३/७/२०२० ने पाठविलेला अहवाल तसेच या आठवड्यात मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी त्यांच्या पत्रात नमूद केलेल्या विविध खात्याकडील आढळून आलेली वसूलपात्र रक्कम रुपये ३,१२,७७५/– चा तक्ता माहितीसाठी.

**विषय क्र. ३०७**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५(१) अन्वये दि. २५/१/२०२० अखेर संपलेल्या आठवडयाचा तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०६(१) (अ) अनुसरुन दि. २५/१/२०२० अखेर संपणाऱ्या आठवडयाचा मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र.मुलेप/५४२ दि. १३/७/२०२० ने पाठविलेला अहवाल तसेच या आठवड्यात मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी त्यांच्या पत्रात नमूद केलेल्या विविध खात्याकडील आढळून आलेली वसूलपात्र रक्कम रुपये १२,०८,५८१/– चा तक्ता माहितीसाठी.

## हिशोब तपासणी अहवाल

**विषय क्र. ३०८**

कर आकारणी व कर संकलन खात्याकडील पेठ येरवडा स.नं. २४७+१४ ब सब प्लॉट नं. २ सिटी स.नं. १५०५/२ ग्लोबल स्क्रेअर सन २०१८–१९ मधील आकारणी प्रकरणांची व तदनुषंगिक कागदपत्रांची तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह व दोषास्पद बाबींबाबत मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र. मुलेप/५२० दि. ६/७/२०२० ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्र. ९ सन २०२०–२०२१ चा विचारासाठी.

**विषय क्र. ३०९**

कर आकारणी व कर संकलन खात्याकडील पेठ शिवाजीनगर स.नं. १३३१/१३३२ फायनल प्लॉट क्र. ७९९, ८०० कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (सी.ई.ओपी) सन २०१५–१६ व सन २०१८–१९ मधील आकारणी प्रकरणांची व तदनुषंगिक कागदपत्रांची तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह व दोषास्पद बाबींबाबत मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र. मुलेप/५२१ दि. ६/७/२०२० ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्र. १० सन २०२०–२०२१ चा विचारासाठी.

## मागील सभेचे विषय

**विषय क्र. ३१०**

प्रभाग क्र.९ बाणेर–बालेवाडी–पाषाण येथील मौजे बाणेर स.नं.८२ येथील ओटा मार्केटचे काम पूर्ण होऊन ५ वर्षे झाली आहेत. तरी सदर वास्तू विनावापर अभावी खराब होत आहे व त्यातून पुणे महानगरपालिकेचे करोडो रुपयांचे नुकसान देखील होत आहे.

सदर ओटा मार्केट मधील गाळे लवकरात लवकर महानगरपालिकेने विशिष्ठ धोरण ठरवून भाडे तत्वावर देण्यात यावे जेणेकरून पुणे म.न.पा.स उत्पन्न सुरु होईल तसेच ज्यांना भाजीपाला ,फळे विक्रीसाठी या गाळ्यांची गरज आहेत अशा विक्रेत्यांना त्याचा लाभ होईल. तसेच यामध्ये पथारीवाले सोडून जे विना

परवाना धारक विक्रेते जरी इच्छुक असतील तर त्यांचा देखील विचार व्हावा व त्यांना देखील पुणे म.न.पा.ने धोरण ठरवून यामध्ये प्राधान्य द्यावे.

तसेच यामध्ये ५०% गाळे हे परवाना धारक विक्रेत्यांना व ५०% गाळे हे विनापरवाना धारक विक्रेत्यांना भाडे तत्वावर पुणे म.न.पा.ने धोरण ठरवून द्यावे.

तरी सदर ओटा मार्केट लवकरात लवकर करून वरील कारवाई करण्यास मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.अमोल बालवडकर, अध्यक्ष,शहर सुधारणा समिती यांचे दि.२६/६/२०२० चे पत्रावर झालेला शहर सुधारणा समिती ठराव क्र. २८ दि.२६/६/२०२० विचारासाठी.
(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. १४/७/२०२० च्या सभेत ठरले होते.)

## संकीर्ण

**विषय क्र. ३११**

मे.औद्योगिक न्यायालय, पुणे आणि मे.उच्च न्यायालय, मुंबई यांचे आदेशाचे पालन करणेसाठी तक्रारदार माजी सैनिकांच्या बहुउद्देशिय पथकात सुपरवायझर व सहाय्यक यांची सहा महिने मुदतीसाठी करार पध्दतीने सेवा घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/सुरक्षा/१५८ दि.८/७/२०२० चे पत्र.

**विषय क्र. ३१२**

प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत शहर स्तरीय तांत्रिक कक्षामधील तज्ञांचे नियुक्तीस १ वर्षाचे मुदतवाढ देणेसाठी खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/प्र.आ.योजना/१६४ दि.१०/७/२०२० चे पत्र.

१) श्री.दिनेश रोकडे यांची सहसंचालक या पदावर व श्री.विश्वनाथ साबणी यांची माहिती प्रणाली तज्ञ या पदावर पुढील दि.०२.०७.२०२० ते दि.०१.०७.२०२१ पर्यत मुदतवाढ देणेस व तशी नेमणूक करण्यास.

२) श्री.दिनेश रोकडे ,सहसंचालक यांचे सद्याचे मानधन रक्कम रु.६८,७६२/- मध्ये ५% वाढ करून एकूण मानधन रक्कम रु.७२,२००/- तसेच श्री .विश्वनाथ साबणी ,माहिती प्रणाली तज्ञ यांचे सद्याचे मानधन र.रु.५०,४६८/- मध्ये ५% वाढ करून रक्कम रु.५२,९९१/- मानधन **दिनांक.०१/०७/२०२० रोजी एक दिवस तांत्रिक खंड देऊन** दि.०२/०७/२०२० पासून पुढील एक वर्षासाठी वेतन अदा करणेस.

३) सन २०२०-२०२१ RE23A138 "पंतप्रधान आवास योजना" या अर्थशीर्षकातून उपरोक्त दोन्ही तज्ञांचे प्रती महा मानधन खर्ची टाकणेस.

४) मे.राज्य व केंद्र शासनाकडून प्राप्त होणारे वेतनासाठीचे अनुदान समायोजित करणेस.

**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

(टिप :– प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)

**सुचना – कोरोना विषाणूमुळे उद्‌भवलेली परिस्थिती विचारात घेवून मे.केंद्र व राज्य शासनाच्या आदेशाचे तंतोतंत पालन करावे ही विनंती.**